1) मुंडेल फ्लेनिंग प्रतिमान हे .......... अर्थव्यवस्थेशी निगडीत आहे.

अ) बंदिस्त

ब) खुली

क) देशीय

ड) वरील सर्व

2) मुंडेल-फ्लेमिंग प्रतिमान .......... दशकात मांडले.

अ) 1950

ब) 1960

क) 1970

ड) 1980

3) मुंडेल-फ्लेमिंग यांच्या मते भांडवली प्रवाहांना चालना केव्हा मिळते?

अ) देशी आणि विदेशी व्याजदरात तफावत झाल्यास

ब) विनिमय दरात वाढ झाल्यास

क) वस्तूच्या किंमतीत वाढ झाल्यास

ड) वस्तूच्या किंमतीत घट झाल्यास

4) जर IS वक्र जास्त लवचिक असेल तर विस्ताराचे मौद्रिक धोरण........

अ) जास्त परिणामकारक ठरते.

ब) फार कमी परिणामकारक ठरते.

क) परिणामकारक ठरत नाही.

ड) मौद्रिक धोरणाचा परिणाम निश्चित असतो.

5) जर IS वक्र क्ष अक्षाला समांतर असेल तर……

अ) विस्ताराचे मौद्रिक धोरण फारसे परिणामकारक ठरत नाही.

ब) विस्ताराचे मौद्रिक धोरण मोठ्या प्रमाणावर परिणामकारक ठरते.

क) विस्ताराचे मौद्रिक धोरण  पूर्ण अपरिणामकारक ठरते.

ड) मौद्रिक धोरणाचा परिणाम अनिश्चित असतो.

6) मौद्रिक धोरणाची परिणामकारकता ………

अ) LM वक्राच्या लवचिकतेवर अवलंबून असते.

ब) IS वक्राच्या लवचिकतेवर अवलंबून असते.

क) IS-LM वक्राच्या लवचिकतेवर अवलंबून असते.

ड) IS-LM वक्राच्या लवचिकतेवर अवलंबून नसते.

7) जर LM वक्र जास्त अलवचिक असेल तर विस्तारित मौद्रिक धोरण ……..

अ) फारसे परिणामकारक ठरत नाही.

ब) जास्त परिणामकारक ठरते.

क) परिणाम शून्य असतो.

ड) परिणाम निश्चित असतो.

8) मुंडेल आणि फ्लेमिंग यांनी आपल्या प्रतिमा नात पूर्ण भांडण भांडवली गतिशीलता असताना …………. कशा पद्धतीने कार्य करते हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

अ) फक्त राजकोषीय धोरण

ब) फक्त मौद्रिक धोरण

क) राजकोषीय आणि मौद्रिक धोरण

ड) यापैकी नाही.

9) गुंतवणुकीत वाढ झाल्यास ........

अ) IS वक्रावर कोणताही परिणाम होत नाही.

ब) LM वक्र डावीकडे स्थलांतरित होतो.

क) IS वक्र हा उजवीकडे स्थलांतरित होतो.

ड) IS वक्र डावीकडे स्थलांतरित होतो.

10) जर शासनाने विस्तारित राजकोषीय धोरण अनुभवले तर शासकीय खर्चात...... होईल.

अ) वाढ

ब) घट

क) वाढ-घट दोन्हीही

ड) यापैकी नाही.

11) मुंडेल फ्लेमिंग प्रतिमानातील गृहीतात वस्तू व उत्पादन घटकांच्या किंमती ...... आहेत असे मांडले आहे.

अ) स्थिर

ब) बदलत्या

क) शून्य

ड) ऋण

12) मुंडेल-फ्लेमिंग प्रतिमान हे .......... विनिमय दरावर आधारित आहे.

अ) स्थिर

ब) बदलते

क) स्थिर आणि बदलते

ड) यापैकी नाही

13) गुंतवणूक हे व्याजदराचे फलित असते.

अ) S = f (y)

ब) I = f (r)

क) S = f (r)

ड) I = f (y)

14) बचत ही उत्पन्नाचे फलित असते.

अ) S = f (y)

ब) I = f (r)

क) S = f (r)

ड) I = f (y)

15) IS तक्त्यामध्ये व्याजदरात घट होत असताना उत्पन्न पातळी.......

अ) वाढत जाते.

ब) घटत जाते.

क) ऋण होत जाते.

ड) धन होत जाते.

16) मुद्रा बाजार समतोलावस्थेत असताना वेगवेगळा व्याजाचा दर आणि उत्पन्न पातळी यांच्या सहाय्याने जे बिंदू प्राप्त होतात त्या बिंदूंना जोडल्यास ......प्राप्त होतो.

अ) LM वक्र

ब) IS वक्र

क) IS आणि LM वक्र

ड) IS-LM समतोल वक्र

17) मुंडेल-फ्लेमिंग प्रतिमानातील गृहितानुसार पैशाची रोखता व पुरवठा .......... धोरणावर अवलंबून असते.

अ) मौद्रिक

ब) राजकोषीय

क) मौद्रिक व राजकोषीय

ड) वित्तीय

18) IS आणि LM वक्र एकमेकांना ज्या बिंदूत छेदतात तेथे ...... समतोल होतो.

अ) IS

ब) LM

क) IS-LM

ड) यापैकी नाही.

19) सार्वजनिक खर्चात वाढ झाल्यास किंवा कराच्या प्रमाणात घट झाल्यास समग्र मागणी वाढते त्यामुळे IS वक्र......

अ) वरच्या दिशेला सरकतो.

ब) खालच्या दिशेला सरकतो.

क) स्थिर राहतो.

ड) ऋणात्मक होतो.

20) सार्वजनिक खर्चात घट झाल्यास किंवा कराच्या प्रमाणात वाढ झाल्यास समग्र मागणी ........... होते.

अ) कमी

ब) जास्त

क) धन

ड) ऋण

21) सार्वजनिक खर्चात वाढ झाल्यास किंवा कराच्या प्रमाणात घट झाल्यास समग्र मागणी .......

अ) वाढते

ब) घटते

क) धन होते.

ड) ऋण होते.

22) मुद्रेच्या पुरवठ्यात वाढ घडून आल्यास......

अ) उत्पन्नात वाढ तर व्याजदरात घट घडून येते.

ब) उत्पन्नात घट तर व्याजदरात वाढ घडून येते.

क) उत्पन्नात घट आणि व्याजदरात घट घडून येते.

ड) उत्पन्नात वाढ आणि व्याजदरात वाढ घडून येते.

23) मुद्रेच्या पुरवठ्यात घट घडून आल्यास......

अ) उत्पन्नात वाढ तर व्याजदरात घट घडून येते.

ब) उत्पन्नात घट तर व्याजदरात वाढ घडून येते.

क) उत्पन्नात घट आणि व्याजदरात घट घडून येते.

ड) उत्पन्नात वाढ आणि व्याजदरात वाढ घडून येते.

24) जर LM वक्र क्षितिज लंब असेल तर सरकारी खर्चातील वाढीमुळे........

अ) व्याजदर वाढतो.

ब) सरकारी खर्चातील वाढीएवढा खाजगी खर्च कमी होतो.

क) समतोल उत्पन्नाची पातळी बदलत नाही.

ड) वरील सर्व गोष्टी घडतात.

25) राजकोषीय धोरण कोणत्या परिस्थितीत अधिक परिणामकारक ठरते?

अ) LM वक्र लवचिक असताना

ब) IS वक्र लवचिक असताना

क) लवचिक LM व अलवचिक IS वक्र असताना

ड) लवचिक LM व लवचिक IS वक्र असताना

26) समष्टी अर्थशास्त्रीय संतुलन प्रामुख्याने कोणत्या बाजार संतुलनाशी निगडित आहे.

अ) वस्तू बाजार

ब) मुद्रा बाजार

क) 'अ' आणि 'ब' दोन्हीही

ड) वरीलपैकी कोणताही बाजार नाही.

27) अर्थव्यवस्थेची विभागणी कोणत्या क्षेत्रात केली जाते?

अ) वास्तव क्षेत्र

ब) मौद्रिक क्षेत्र

क) 'अ' आणि 'ब' दोन्हीही

ड) वरीलपैकी एकही नाही.

28) वस्तू बाजारातील किंवा वास्तव क्षेत्रातील संतुलन ......

अ) IS वक्राशी निगडित असते.

ब) LM वक्राशी निगडीत असते.

क) IS-LM वक्राशी निगडित असते.

ड) वरीलपैकी कोणत्याही वक्राशी निगडित नसते.

29) IS-LM प्रतिमान कोणत्या विश्लेषणावर आधारित आहे?

अ) केन्सच्या अर्थशास्त्रावर

ब) सनातनवाद्यांच्या विश्लेषणावर

क) नवसनातनवाद्यांच्या विश्लेषणावर

ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

30) IS-LM विश्लेषण मांडण्याचे श्रेय कोणाला दिले जाते?

अ) केन्स

ब) हिक्स

क) टॉबिन

ड) फ्रीडमन

31) IS वक्र.....चे विविध गट दर्शवतो, ज्याला वस्तुबाजारात संतुलन आढळून येते.

अ) बचत आणि गुंतवणूक

ब) उत्पन्न आणि उपभोग

क) उत्पन्न आणि व्याज

ड)बचत आणि व्याज

32) LM वक्र...... क्षेत्राच्या संतुलनाशी निगडित असतो.

अ) वास्तव क्षेत्र

ब) मौद्रिक क्षेत्र

क) औद्योगिक क्षेत्र

ड) सेवा क्षेत्र

33) मौद्रिक बाजारातील संतुलन ........वक्राद्वारे दर्शविले जाते.

अ) IS वक्र

ब) LM वक्र

क) मागणी वक्र

ड)पुरवठा वक्र

34) LM वक्र व्याजदर आणि उत्पन्न यांचे भिन्न गट दर्शवतो, ज्याला ........संतुलित अवस्थेत असतो.

अ) वस्तू बाजार

ब) घटक बाजार

क) शेअर बाजार

ड) मुद्रा बाजार

35) IS वक्रावरील किती बिंदू वस्तू बाजारातील संतुलन दर्शवितात ?

अ) एकच बिंदू

ब) एकही नाही

क) सर्वच बिंदू

ड) दोन बिंदू

36) LM वक्रावरील किती बिंदू मुद्रा बाजारातील संतुलन दर्शवितात?

अ) सर्वच बिंदू

ब) पाच बिंदू

क) एकही नाही

ड) तीन बिंदू

37) IS वक्र कसा मिळवला जातो?

अ) केन्सच्या रोखता पसंती प्रतिमानाद्वारे

ब) केन्सच्या उत्पन्न रोजगार प्रतिमानाद्वारे

क) केन्सच्या उपभोग फलनाद्वारे

ड) वरीलपैकी एकही नाही.

38) LM वक्र कसा मिळवला जातो?

अ) केन्सच्या पैशाच्या मागणी-वक्राद्वारे

ब) केन्सच्या उत्पन्न रोजगार प्रतिमानाद्वारे

क) केन्सच्या उपभोग फलनाद्वारे

ड) वरीलपैकी सर्व

39) वस्तू बाजार आणि मुद्रा बाजार यांचा एकत्रित समतोल कोणत्या बिंदूत साधला जातो?

अ) IS वक्रावरच्या सर्व बिंदूंवर

ब)LM वक्रावरच्या सर्व बिंदूंवर

क)IS आणि LM वक्र एकमेकांस छेदतात तेथे

ड)वरीलपैकी एकही नाही.

40) IS वक्राचा उतार कसा असतो?

अ) नकारात्मक

ब) होकारात्मक

क) शून्य उतार

ड) अनिश्चित

41) LM वक्राचा उतार कसा असतो?

अ) नकारात्मक

ब) होकारात्मक

क) शून्य उतार

ड) अनिश्चित

42) IS वक्राच्या बाबतीत उत्पन्न आणि व्याजदर यांत ....

अ) एकाच दिशेचा संबंध असतो.

ब) व्यस्त संबंध असतो.

क) कोणताही संबंध नसतो.

ड) संबंध अनिश्चित असतो.

43) LM वक्राच्या बाबतीत उत्पन्न आणि व्याजदर यांत ....

अ) एकाच दिशेचा संबंध असतो.

ब) व्यस्त संबंध असतो.

क) कोणताही संबंध नसतो.

ड) संबंध अनिश्चित असतो.

44) LM वक्र.......शी संबंधित असतो.

अ) राजकोषीय धोरण

ब) मौद्रिक धोरण

क) राजकोषीय आणि मौद्रिक धोरण

ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

45) राजकोषीय धोरण ..........शी संबंधित आहे.

अ) LM वक्र

ब) IS वक्र

क) एकुण पुरवठा वक्र

ड) वरीलपैकी एकही नाही.

46) जेव्हा उत्पादन घटक आणि आदानांची शासनाची मागणी वाढते तेव्हा खाजगी गुंतवणूकीच्या बहिर्गमन परिणामाला...........असे म्हटले जाते.

अ) राजकोषीय परिणाम

ब) भौतिक परिणाम

क) मौद्रिक परिणाम

ड) वरीलपैकी एकही नाही.

47) IS वक्राचा उतार .........वर अवलंबून असतो.

अ) व्याजदरातील बदलाला उपभोगाचा मिळालेला प्रतिसाद

ब) व्याजदरातील बदलाला बचतीचा मिळालेला प्रतिसाद

क) व्याजदरातील बदलाला गुंतवणुकीचा मिळालेला प्रतिसाद

ड) यापैकी एकही कारण नाही.

48) जरा LM वक्र उजवीकडे स्थलांतरित होत असेल तर .......

अ) पैशाच्या पुरवठ्यात घट झाली असे म्हणावे लागेल.

ब) पैशाचा पुरवठा स्थिर आहे असे म्हणावे लागेल.

क) पैशाच्या पुरवठ्यात वाढ झाली असे म्हणावे लागेल.

ड) वरीलपैकी एकही नाही.

49) IS वक्र जितका उभट असेल तितकी राजकोषीय धोरणाची परिणामकारकता.......... राहील.

अ) जास्त

ब) कमी

क) ऋण

ड) धन

50) LM वक्र जितका पसरट असेल तितकी राजकोषीय धोरणाची परिणामकारकता.......... राहील.

अ) जास्त

ब) कमी

क) ऋण

ड) धन

51) रोखता प्राधान्य सिद्धांतानुसार व्याजाचा दर रोखतेची मागणी आणि रोखतेचा पुरवठा यांच्या संतुलनातून निश्चित होतो.

अ) भांडवलाची मागणी व भांडवलाचा पुरवठा

ब) रोखतेची मागणी आणि रोखतेचा पुरवठा

क) श्रमाची मागणी आणि श्रमाचा पुरवठा

ड) यापैकी एकही नाही.

52) लॉर्ड केन्स यांच्या मते, लोकांची बचत ही ..........अवलंबून असते.

अ) उत्पन्नावर

ब) व्याजदरावर

क) 'अ' आणि 'ब' दोन्ही

ड) यापैकी एकही नाही.

53) व्याजाचा आधुनिक सिद्धांत ........ यांनी मांडला.

अ) प्रा. हिक्स आणि हेन्सन

ब) प्रा. केन्स

क) डॉ. मार्शल

ड) प्रा. पिगू

54) वस्तू बाजारात समतोल असल्यावर व्याजदर आणि उत्पन्नाची पातळी यांच्या संयोगाची अनुसूची म्हणून ..... होय.

अ) IS वक्र

ब) LM वक्र

क) IS-LM वक्र

ड) वरील सर्व वक्र

55) आधुनिक अर्थतज्ञ प्रा. जे. आर. हिक्स आणि हेन्सन यांनी .......... साली व्याजाचा आधुनिक सिद्धांत मांडला.

अ) 1937

ब) 1940

क) 1947

ड) 1935

56) IS वक्राचा उतार........... स्वरूपाचा असतो.

अ) ऋणात्मक

ब) धनात्मक

क) एकक

ड) यापैकी नाही.

57) स्वायत्त खर्चात वाढ झाल्यास IS वक्र हा ......... सरकतो.

अ) उजवीकडे

ब) डावीकडे

क) 'अ' आणि 'ब' दोन्हीही

ड) यापैकी एकही नाही.

58) IS वक्र खाली उतरताना डावीकडून उजवीकडे जातो तेव्हा चलनविषयक धोरण व्याजदरात काही घट करतो आणि राष्ट्रीय उत्पन्नात ...... करतो.

अ) वाढ

ब) घट

क) 'अ' आणि 'ब' दोन्हीही

ड) यापैकी एकही नाही.

59).........यांनी व्याजाच्या रोखता पसंती सिद्धांतात मुद्रा बाजारातील समतोल विचारात घेतलेला आहे.

अ) लॉर्ड केन्स

ब) डॉ. मार्शल

क) प्रा. नाईट

ड) प्रा. शुंपिटर

60) ..............समतोल रोखतेची मागणी आणि रोखतेचा पुरवठा यांच्यातील समतोल होय.

अ) वस्तू बाजारातील

ब) मुद्रा बाजारातील

क) 'अ' आणि 'ब' दोन्ही बाजारातील

ड) यापैकी एकही नाही.

61) रोखतेची मागणी ही .......... हेतूने होत असते.

अ) व्यवहार

ब) दक्षता

क) सट्टेबाजीचा

ड) 'अ' , 'ब' आणि 'क' तिन्ही

62) व्यवहार हेतू आणि दक्षता हेतू या हेतूने रोखतेची मागणीही ..........अवलंबून असते.

अ) व्याजदरावर

ब) उत्पन्नावर

क) किंमतीवर

ड) बचतीवर

63) सट्टेबाजीच्या हेतूने रोखतेसाठी मागणी ही .......अवलंबून असते.

अ) व्याजदरावर

ब) उत्पन्नावर

क) किंमतीवर

ड) बचतीवर

64) उत्पन्नाचे फलित ...........आहे.

अ) बचत

ब) व्याजदर

क) गुंतवणूक

ड) किंमत

65) बचत आणि उत्पन्न यांच्यामध्ये साधारणत: कोणता संबंध असतो?

अ) सम संबंध

ब) धन संबंध

क) ऋणात्मक संबंध

ड) धनात्मक संबंध

66) जर IS वक्र ऋणात्मक उताराचा असेल तर LM वक्र जर उभा लंबरूप असेल तर सरकारी खर्चातील वाढीमुळे.......

अ) उत्पन्न पातळीत वाढ होईल.

ब) उत्पन्न पातळीत घट होईल.

क) व्याजदरात वाढ होईल.

ड) व्याजदरात घट होईल.

67) सार्वजनिक खर्चात वाढ होत असताना LM वक्र साधारण लवचिक असेल तर त्यामूळे व्याजदरात थोड्या प्रमाणात वाढ होऊन खाजगी गुंतवणुकीचे .............

अ) आंशिक बहिर्गमन होते.

ब) बहिर्गमन होत नाही.

क) पूर्ण बहिर्गमन होते.

ड) यापैकी नाही.

68) जर एकाच वेळी सारख्याच प्रमाणात IS वक्र आणि LM वक्र उजवीकडे स्थलांतरित होत असतील तर व्याजदरावर काय परिणाम होईल?

अ) व्याजदरात वाढ होईल.

ब) व्याजदरात घट होईल.

क) व्याजदर स्थिर होईल.

ड) वरीलपैकी एकही नाही.

69) जर एकाच वेळी सारख्याच प्रमाणात IS वक्र आणि LM वक्र उजवीकडे स्थलांतरित होत असतील तर उत्पन्नावर काय परिणाम होईल?

अ) उत्पन्नात वाढ होईल.

ब) उत्पन्न स्थिर राहील.

क) उत्पन्नात घट होईल.

ड) वरीलपैकी एकही नाही.

70) राजकोषीय धोरण कोणत्या परिस्थितीत अधिक परिणामकारक ठरते.

अ) LM वक्र क्ष अक्षाला समांतर असताना.

ब) IS वक्र क्षितिज लंबअसताना

क) LM वक्र लंबरूप असताना

ड) वरीलपैकी एकही नाही

71) व्याजदराच्या आधुनिक सिद्धांतासाठी .......

अ) IS वक्राचा वापर केला आहे.

ब) LM वक्राचा वापर केला आहे.

क) IS आणि LM प्रतिमानाचा वापर केला आहे.

ड) पैशाच्या मागणीचा विचार केला आहे.

72) परिकल्पन हेतू (सट्टेबाजीचा हेतू) साठी केलेली पैशाची मागणी प्रामुख्याने ..........वर अवलंबून असते.

अ) वेतनावर

ब) चलनवाढीवर

क) व्याजदरावर

ड) उत्पन्नावर

73) दक्षता हेतू आणि व्यवहारी हेतूसाठी केलेली पैशाची मागणी प्रामुख्याने ........अवलंबून असते.

अ) वेतनावर

ब) चलनवाढीवर

क) व्याजदरावर

ड) उत्पन्नावर

74) दक्षता हेतू व व्यवहार हेतू यासाठी केलेली पैशाची मागणी .........

(i) उत्पन्न अलवचिकता दर्शविते.

(ii) व्याज अलवचिकता दर्शविते.

(iii) उत्पन्न लवचिकता दर्शविते.

(iv) व्याज लवचिकता दर्शविते.

अ) (i) आणि (ii) ब) (i) आणि (iii) क) (ii) आणि (iv) ड) (ii) आणि (iii)

75) केन्सच्या व्याजदरासंबंधीच्या सिद्धांतात....

अ) पैशाचा पुरवठा वाढत जातो असे गृहीत धरले आहे.

ब) पैशाचा पुरवठा कमी-कमी होत जातो असे गृहीत धरले आहे.

क) पैशाचा पुरवठा स्थिर होत असतो असे गृहीत धरले आहे.

ड) पैशाचा पुरवठा बदलता असतो असे गृहीत धरले आहे.

76) केन्सच्या मते पैशाचा पुरवठा......

अ) व्याज लवचिकता दर्शवतो.

ब) व्याज अलवचिकता दर्शवतो.

क) व्याज लवचिकता तसेच व्याज अलवचिकता दर्शवतो.

ड) वरीलपैकी एकही नाही.

77) रोखता पसंती सिद्धांत मांडून केन्सने व्याजदर हा...........

अ) फक्त पैशाच्या मागणीवर अवलंबून आहे असे दर्शवले आहे.

ब) फक्त पैशाच्या पुरवठ्यावर अवलंबून आहे असे म्हटले आहे.

क) पैशाच्या मागणी आणि पुरवठ्यावर अवलंबून असतो असे म्हटले आहे.

ड) पैशाची मागणी आणि पुरवठा विचारात घेतला नाही.

78) व्याजाच्या आधुनिक सिद्धांतातील नावीन्य म्हणजे........

अ) उपभोग आणि व्याजदर यांचा एकाच वेळी विचार केलेला आहे.

ब) बचत आणि व्याजदर यांचा एकाच वेळी विचार केलेला आहे.

क) उपभोग, बचत आणि व्याजदर यांचा एकाच वेळी विचार केलेला आहे.

ड) उत्पन्न आणि व्याजदर यांचा एकाच वेळी विचार केलेला आहे.

79) व्याजदर........

अ) ऋणात्मक असू शकतो.

ब) नेहमी धनात्मक असतो.

क) शून्याएवढा असू शकतो.

ड) स्थिर असतो.

80) नवसनातनवादी सिद्धान्तानुसार व्याजदर .............. यांच्यातून निश्चित होतो.

अ) कर्जाऊ निधीची मागणी आणि कर्जाऊ निधीचा पुरवठा

ब) रोखतेची मागणी आणि रोखतेचा पुरवठा

क) भांडवलाची मागणी आणि भांडवलाचा पुरवठा

ड) यापैकी नाही

81) IS वक्र असे दर्शवतो की, उत्पन्न आणि व्याजदर यांत व्यस्त संबंध असतो, कारण.......

अ) व्याजदरात घट झाली असता गुंतवणुकीत वाढ होते व त्यामुळे उत्पन्नात वाढ होते.

ब) व्याजदरात वाढ झाली असता गुंतवणुकीत घट होते आणि उत्पन्नात घट होते.

क) 'अ' आणि 'ब'

ड) वरील दोन्हीही कारणे नाहीत.

82) LM वक्र डावीकडून उजवीकडे वरच्या बाजूस सरकतो, कारण ..........

अ) उत्पन्नातील वाढीमुळे पैशाच्या मागणीत वाढ होत असते म्हणून व्याजदरात वाढ होते.

ब) उत्पन्नातील वाढीमुळे पैशाच्या मागणीत घट होत असते.

क) उत्पन्नात वाढ झाली तरी पैशाची मागणी स्थिर राहते.

ड) वरीलपैकी एकही कारण नाही.

83) जर पैशाची मागणी व्याजादराला अजिबात प्रतिसाद देत नसेल तर LM वक्र........

अ) पूर्णपणे लवचिक असेल.

ब) सर्वसाधारणपणे लवचिक असेल.

क) पूर्णपणे अलवचिक असेल.

ड) लवचिकता अनिश्चित असते.

84) जर LM वक्र उजवीकडे स्थलांतरित होत असेल तर..........

अ) व्याजदरात घट होते.

ब) उत्पन्न पातळीत वाढ होते.

क) उत्पन्न पातळी स्थिर राहते.

ड) 'अ' आणि 'ब'

85) जर IS वक्र वरच्या बाजुस सरकत असेल तर......

अ) एकूण मागणीत घट होत असेल.

ब) एकूण मागणीत वाढ होत असेल.

क) एकूण मागणी स्थिर असेल.

ड) वरीलपैकी एकही नाही.

86) संतुलित व्याजदर आणि संतुलित उत्पन्न पातळी निश्चित करण्यासाठी ........

अ) फक्त वस्तू बाजारातील संतुलन पुरेसे ठरते.

ब) फक्त मुद्रा बाजारातील संतुलन पुरेसे ठरते.

क) वस्तू बाजार आणि मुद्रा बाजार एकाच वेळी संतुलित अवस्थेत असावे लागतात.

ड) वरीलपैकी एकही कारण नाही.

87) IS-LM वक्र विश्लेषणानुसार बदलत्या व्याजदराचा एकूण मागणीवर कोणता परिणाम होतो?

अ) एकूण मागणीत बदल होतो.

ब) एकूण मागणीत स्थिर राहते.

क) एकूण मागणीवरील परिणाम अनिश्चित असतो.

ड) वरीलपैकी एकही नाही.

88) IS वक्र.............

अ) मुद्राबाजार

ब) वस्तुबाजार

क) घटकबाजार

ड) यापैकी नाही.

89) राजकोषीय धोरणाची परिणामकारकता ..........

अ) IS वक्राच्या उतारावर अवलंबून असते.

ब) LM वक्राच्या उतारावर अवलंबून असते.

क) IS-LM या दोन्ही वक्राच्या उतारावर अवलंबून असते.

ड) IS-LM प्रतिमानाशी संबंधित नाही.

90) शासनाचे विस्तारित राजकोषीय धोरण म्हणजेच .........

अ) शासकीय खर्चामधील वाढ होय.

ब) करामध्ये केलेली घट होय.

क) 'अ' आणि 'ब'

ड) शासकीय खर्चातील घट आणि करामधील वाढ होय.

91) दोन देशांच्या चलनांचा दर ........

अ) वेतन दर

ब) विनिमय दर

क) चलन दर

ड) वरीलपैकी सर्व

92) विनिमय दर निश्चितीच्या संकल्पना ........

अ) सुवर्ण परिणाम विनिमय दर

ब) स्थिर विनिमय दर

क) बदलता विनिमय दर

ड) वरीलपैकी सर्व

93) ........ मध्ये विनिमय दराबाबत चे ब्रेटन वूडस व्यवस्थेचा अंत झाला.

अ) 1971

ब) 1972

क) 1973

ड) 1974

94) .........च्या जानेवारीपासून जमैका करार अस्तित्वात आला.

अ) 1976

ब) 1977

क) 1978

ड) 1979

95) विदेशी विनिमय बाजार पेठेतील बहुतांश व्यवहार हे ........ बाजारा मार्फत पार पाडले जातात.

अ) आंतर बॅंक

ब) ग्रामीण बॅंक

क) औद्योगिक बॅंक

ड) वरीलपैकी एकही नाही.

96) दोन व्यक्ती एका ठराविक काळाकरिता आपल्याकडील चलनांची एका निश्चित दराला अदलाबदल करून भविष्यातील विनिमयदर चढ उताराची जोखीम कमी करतात त्यास ...... असे म्हणतात.

अ) आदलाबदलीचे व्यवहार

ब) सट्टेबाजीचे व्यवहार

क) वायदा दर व्यवहार

ड) तात्काळ दर व्यवहार

97) दुसऱ्या महायुद्धादरम्यानच्या काळात न्यू हॅम्पशायरमधील ब्रेटनवूड्स येथे ........ राष्ट्रांनी एकत्र येऊन वैश्विक मुद्रा व्यवस्था टिकवण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना करण्याचे ठरविले.

अ) 45

ब) 44

क) 47

ड) 48

98) मेक्सिको वित्तीय आरिष्ट.......

अ) 1994

ब) 1992

क) 1990

ड) यापैकी नाही.

99) 1997 मधील वित्तीय आरिष्ट......

अ) पूर्व आशियातील आरिष्ट

ब) मेक्सिको आरिष्ट

क) अर्जेंटिना आरिष्ट

ड) ब्राझील आरिष्ट

100) रशियन आणि ब्राझील वित्तीय आरिष्ट....

अ) 1998

ब) 1991

क) 1993

ड) 1992

101) ........... वित्तीय आरिष्ठांचे मुख्य आणि महत्वाचे कारण म्हणजे तकलादू निष्क्रिय कंपनी प्रशासन होय.

अ) पूर्व आशियाई

ब) रशियन

क) मेक्सिको

ड) अर्जेंटिना

102) .......... मध्ये ब्रेटन वूडस यंत्रणेचा नाश झाला.

अ) 1971

ब) 1972

क) 1973

ड) 1974

103) जानेवारी ....... मध्ये जमैका करार मान्य झाला.

अ) 1976

ब) 1975

क) 1974

ड) 1973

104) ......... च्या प्रारंभी मेक्सिकोमध्ये आर्थिक सुधारणेचा कार्यक्रम राबविण्यात आला.

अ) 1990

ब) 1980

क) 1981

ड) 1991

105) विनिमय दर हा आपल्या देशाच्या चलनाचे ........... मूल्य दर्शवित असतो.

अ) बहिर्गत

ब) अंतर्गत

क) 'अ' आणि 'ब' दोन्हीही

ड) यापैकी नाही.

106) ................ म्हणजे एका देशाच्या चलनाची दुसऱ्या देशाच्या चलना बाबतची किंमत होईल.

अ) वाजवी विनिमय दर

ब) वास्तव विनिमय दर

क) 'अ' आणि 'ब' दोन्हीही

ड) वरीलपैकी नाही

107) ........ महायुद्धाच्या काळातील विनिमयदर सुवर्ण परिणाम पद्धतीने निश्चित केला जात असे.

अ) पहिल्या

ब) दुसऱ्या

क) तिसऱ्या

ड) यापैकी नाही.

108) स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने इतर देशांप्रमाणे ......... विनिमयदर पद्धतीचा स्वीकार केला.

अ) बदलत्या

ब) स्थिर

क) तरलता

ड) यापैकी नाही.

109) भारतात ......... पासून आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविला जात आहे.

अ) 1990

ब) 1991

क) 1992

ड) 1993

110) आजच्या स्थितीत भारतात तुलनात्मकदृष्ट्या .........विनिमय दर पद्धतीची निवड केली जात आहे.

अ) स्थिर

ब) बदलता

क) दोन्हीही

ड) यापैकी नाही

111) सट्टेबाजीचे उच्चाटन करण्यासाठी विनिमयदर ........असावेत.

अ) स्थिर

ब) बदलते

क) तरंगते

ड) यापैकी नाही.

112) जगात जेव्हा सुवर्ण परिमाण पद्धती होती तेव्हा हुंडावळीचा दर ......... ठेवणे शक्य होते.

अ) स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

113) आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने .........पर्यंत विनिमय दर स्थिर ठेवण्याच्या धोरणाचा पुरस्कार केला होता.

अ) 1971

ब) 1972

क) 1973

ड) 1974

114) ........विनिमयदरामुळे आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थैर्यास हातभार लागतो.

अ) स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

115) डॉलर पौंड असे विविध चलन गट ...........विनिमय दरामुळे टिकून राहतात.

अ) स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

116) विनिमय दर ......... असेल तर चलनवाढीच्या धोक्याला तोंड द्यावे लागत नाही.

अ) स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

117) .........विनिमय दरामुळे सट्टेबाजीला उत्तेजन मिळते.

अ) स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

118) बदलत्या विनिमय दरामुळे अनिश्चितता निर्माण होऊन दीर्घकालीन गुंतवणूक.........

अ) घटते.

ब) वाढते.

क) ऋण होते.

ड) धन होते.

119) पूर्ण रोजगार असेल तर ......... विनिमय दरामुळे भाववाढ होण्याची शक्यता असते.

अ) स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

120) विनिमय दर ...........असेल तर व्यवहारतोल असमतोलाची समस्या निर्माण होईल.

अ)स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

121) विनिमय दर ..........असतील तर  आंतरराष्ट्रीय देयतेची समस्या निर्माण होईल.

अ)स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

122) ......... विनिमय दरामुळे जागतिक पातळीवर चलनाची विश्वसनीयता वाढते.

अ)स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

123) .......... विनिमय दर लहान आकाराच्या देशांना अधिक फायदेशीर असतात.

अ)स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

124) ज्या देशातून मोजक्याच वस्तूंची निर्यात केली जाते आणि त्या बदल्यात मोजक्याच वस्तूंची आयात केली जाते अशा देशांसाठी ............ विनिमय दर अधिक उपयुक्त ठरतात.

अ)स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

125) ज्या देशातून अनेक वस्तूंची आयात-निर्यात केली जाते तसेच वस्तूंमध्ये विविधता असते अशा देशांसाठी ........... विनिमयदर अधिक उपयुक्त ठरतात.

अ)स्थिर

ब) बदलता

क) तरंगता

ड) वरीलपैकी तिन्हिही

126)एका देशातील नागरिक दुसऱ्या देशात वस्तू व सेवांची निर्यात करतात तसेच ते परदेशातून वस्तू व सेवा आयात करतात आणि ती जागतिक वित्तीय बाजारांमध्ये कर्ज घेतात आणि कर्ज देतात या सर्व बाबींना .......असे म्हणतात

अ) आंतरराष्ट्रीय व्यापार

ब) देशांतर्गत व्यापार

क) बंदिस्त व्यापार

ड) संकुचित बाजाराती

127) अर्थव्यवस्थेच्या खुलेपणाच्या प्रकारापैकी योग्य पर्याय ओळखा.

अ) वस्तू बाजारातील खुलेपणा

ब) भांडवल बाजारातील खुलेपणा

क) घटक बाजारातील खुलेपणा

ड) यापैकी सर्व

128) वस्तू आणि सेवांची निर्मिती स्थानिक देशांमध्ये करून ती परकीय देशात विक्री करणे म्हणजे.......... होय.

अ) निर्यात

ब) आयात

क) विक्री

ड) खरेदी

129) परकीय देशांमध्ये उत्पादित केलेल्या वस्तू आणि सेवांची स्थानिक देशांमध्ये खरेदी करणे म्हणजे .......... होय.

अ) निर्यात

ब) आयात

क) विक्री

ड) खरेदी

130) अर्थव्यवस्थेतील निर्यात मूल्य आणि आयात मुले यांच्यातील फरक म्हणजे ..........होय.

अ) निव्वळ निर्यात

ब) निव्वळ आयात

क) एकूण निर्यात

ड) एकूण आयात

131) जर एकूण आयात मूल्यापेक्षा एकूण निर्यात मूल्य अधिक असेल तर त्या अर्थव्यवस्थेचे निव्वळ निर्यात मूल्य ......... असते.

अ) धनात्मक

ब) ऋणात्मक

क) स्थिर

ड) नकारात्मक

132) जर देशाचे ............असेल तर याचा अर्थ असा होतो की तो देश जगातील इतर राष्ट्रांकडून जेवढ्या वस्तू आणि सेवांची खरेदी करतो त्यापेक्षा अधिक वस्तू व सेवांची विक्री परकीय देशांना करतात.

अ) निव्वळ निर्यात मूल्य धनात्मक

ब) निव्वळ आयात मूल्य धनात्मक

क) एकूण निर्यात मूल्य ऋणात्मक

ड) एकूण आयात मूल्य ऋणात्मक

133) जर देशाचे एकूण निर्यात मूल्य एकूण आयात मूल्यापेक्षा कमी असेल तर त्या देशाचे निव्वळ निर्यात मूल्य ........... असते.

अ) धनात्मक

ब) ऋणात्मक

क) स्थिर

ड) वाढणारे

134) जर देशाचे एकूण निर्यात मूल्य हे एकूण आयात मूल्याबरोबर असेल तर निव्वळ निर्यात मूल्य शून्य असते.

अ) धनात्मक

ब) ऋणात्मक

क) स्थिर

ड) शून्य

135) देशातील नागरिकांनी परदेशातील मत्तांची केलेली खरेदी आणि परकीय नागरिकांनी देशातील केलेली मत्तांची केलेली खरेदी यातील फरक म्हणजेच.......... होय.

अ) श्रमाचा निव्वळ बहिर्गत प्रवाह

ब) श्रमाचा निव्वळ अंतर्गत प्रवाह

क) भांडवलाचा निव्वळ बहिर्गत प्रवाह

ड) उद्योजकांचा निव्वळ अंतर्गत प्रवाह

136) परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक आणि परकीय संस्थात्मक गुंतवणूक हे ...........दोन प्रकार पडतात.

अ) उद्योजकांचा अंतर्गत प्रवाहाचे

ब) भांडवलाच्या बहिर्गत प्रवाहाचे

क) श्रमाचा अंतर्गत प्रवाहाचे

ड) श्रमाचा बहिर्गत प्रवाहाचे

137) जेव्हा देशातील नागरिक विदेशातील गुंतवणूकदारांनी खरेदी केलेल्या देशातील मत्तांच्या प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात परकीय मत्तांचीखरेदी करतात या परिस्थितीला देशातील भांडवलाचा प्रवाह विदेशामध्ये मोठ्या प्रमाणात होतो यालाच भांडवलाचा निव्वळ बहिर्गत प्रवाह ............. असतो असे म्हणतात.

अ) शून्य

ब) ऋणात्मक

क) स्थिर

ड) धनात्मक

138) जेव्हा देशातील नागरिक विदेशातील गुंतवणूकदारांनी खरेदी केलेल्या देशातील मत्तांच्या प्रमाणापेक्षा कमी प्रमाणात विदेशातील मत्तांची खरेदी करतात अशा परिस्थितीत परदेशातून देशांमध्ये भांडवलाचा प्रवाह अधिक प्रमाणात होतो यालाच भांडवलाचा निवड बहिर्गत प्रवाह हा ............असतो असे म्हणतात.

अ) शून्य

ब) ऋणात्मक

क) स्थिर

ड) धनात्मक

139)..................म्हणजे देशांतर्गत वस्तूंची परकीय वस्तूमध्ये व्यक्त केलेली किंमत होय.

अ) वास्तव विनिमय दर

ब) परकीय विनिमय दर

क) वाजवी विनिमय दर

ड) यापैकी सर्व

140) जेव्हा देशच्या चलनाचे मूल्य परकीय चलनाच्या तुलनेत वाढते तेव्हा त्याला विनिमय दराचे ........ असे म्हटले जाते.

अ) अधिमूल्यन

ब) अवमूल्यन

क) उर्ध्वमूल्यन

ड) यापैकी सर्व

141) परकीय चलनाच्या तुलनेत देशी चलनाचे मूल्य कमी होणे म्हणजे देशी चलनाचे ........... होणे होय.

अ) अधिमूल्यन

ब) अवमूल्यन

क) उर्ध्वमूल्यन

ड) यापैकी सर्व

142) जेव्हा देशातील एकूण मागणी (देशांतर्गत मागणी व परकीय मागणी) आणि देशांतर्गत उत्पादन समान होते तेव्हा त्या देशातील ............. अवस्थेत असतो.

अ) पैसा बाजार समतोल

ब) घटक बाजार समतोल

क) वस्तू बाजार समतोल

ड) श्रम बाजार समतोल

143) एका आर्थिक वर्षात एखादा अर्थव्यवस्थेत तयार झालेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे बाजार मूल्य म्हणजे .............होय.

अ) स्थूल देशांतर्गत उत्पन्न

ब) राष्ट्रीय उत्पन्न

क) निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न

ड) निव्वळ देशांतर्गत उत्पन्न

144)  दोन देशांच्या चलनांच्या सापेक्ष किमती म्हणजे............होय.

अ) वास्तव विनिमय दर

ब) वाजवी विनिमय दर

क) परकीय विनिमय दर

ड) यापैकी नाही

145) देशाच्या चलनाची किंमत विदेशी चलनाच्या तुलनेत जेव्हा हेतुपूर्वक कमी करण्यात येते तेव्हा त्याला ...... असे म्हणतात

अ) अधिमूल्यन

ब) अवमूल्यन

क)  उर्ध्वमूल्यन

ड)  यापैकी सर्व

146)  देशाच्या चलनाची किंमत विदेशी चलनाच्या तुलनेत जेव्हा हेतुपूर्वक वाढवली जाते तेव्हा त्याला चलनाचे ....... असे म्हणतात

अ) अधिमूल्यन

ब) अवमूल्यन

क) उर्ध्वमूल्यन

ड) यापैकी सर्व

147) जेव्हा निर्यात मूल्य > आयात मूल्य, निव्वळ निर्यात > 0,  बचत > गुंतवणूक,  भांडवलाचा निव्वळ बहिर्गत प्रवाह > 0  असतो तेव्हा ....... असते

अ) व्यापार तूट

ब) समतोल व्यापार

क) व्यापार अधिक्य

ड) यापैकी सर्व

148) जेव्हा निर्यात मूल्य = आयात मूल्य, निव्वळ निर्यात = 0,  बचत = गुंतवणूक,  भांडवलाचा निव्वळ बहिर्गत प्रवाह = 0  असतो तेव्हा ....... असतो

अ) व्यापार तूट

ब) व्यापार समतोल

क) व्यापार अधिक्य

ड) यापैकी सर्व

149) जेव्हा निर्यात मूल्य < आयात मूल्य, निव्वळ निर्यात <  0,  बचत <  गुंतवणूक,  भांडवलाचा निव्वळ बहिर्गत प्रवाह <  0  असतो तेव्हा ....... असते

अ) व्यापार तूट

ब) व्यापार समतोल

क) व्यापार अधिक्य

ड) यापैकी सर्व

150) वास्तव विनिमय दर =

अ) $(E \times P) \div P^{*}$

ब) $(E - P) - P^{*}$

क) $(P^{*} - E) / E$

ड) यापैकी नाही

151) वाजवी विनिमय दर म्हणजे …..

अ) असा दर की ज्यामध्ये एक व्यक्ती एका देशाच्या चलनाच्या बदल्यामध्ये दुसऱ्या देशाच्या चलनाचा व्यवहार करू शकते.

ब) असा दर की ज्या दराने एक व्यक्ती एका देशाच्या चलनाच्या बदल्यामध्ये दुसऱ्या देशाच्या वस्तूंचा व्यवहार करू शकते.

क) असा दर की ज्या दराने एक व्यक्ती एका देशातील वस्तू व सेवांच्या बदल्यात दुसऱ्या देशातील वस्तू व सेवांचा व्यवहार करू शकते.

ड) यापैकी नाही.

152) वास्तव विनिमय दर म्हणजे …….

अ) असा दर की ज्यामध्ये एक व्यक्ती एका देशाच्या चलनाच्या बदल्यामध्ये दुसऱ्या देशाचे चलनाचा व्यवहार करू शकते.

ब) असा दर की ज्या दराने एक व्यक्ती एका देशाच्या चलनाच्या बदल्यामध्ये दुसऱ्या देशाच्या वस्तूंचा व्यवहार करू शकते.

क) असा दर की ज्या दराने एक व्यक्ती एका देशातील वस्तू व सेवांच्या बदल्यात दुसऱ्या देशातील वस्तू व सेवांचा व्यवहार करू शकते.

ड) यापैकी नाही.

153) आयात फलन हे पुढीलप्रमाणे दाखवले जाते .

अ) $IM = M (Y, €)$

ब) $X = X (Y^*, €)$

क) $IM = Y(M, €)$

ड) $Y^* = (X, €)$

154) निर्यात फलन पुढीलप्रमाणे लिहिले जाते.

अ) IM = M (Y,€)

ब) X = X (Y*, €)

क) IM = Y(M,€)

ड) Y* = (X, €)

155) देशांतर्गत उत्पन्न किंवा उत्पादनात वाढ झाली तर ........... वाढ होते.

अ) निर्यातीमध्ये

ब) निव्वळ उत्पन्नामध्ये

क) आयातीमध्ये

ड) परकीय नफ्यामध्ये

155) देशांतर्गत उत्पन्न आणि आयात यामध्ये ...........संबंध आहे.

अ) धनात्मक

ब) ऋणात्मक

क) स्थिर

ड) शून्य

156) वास्तविक विनिमय दरात वाढ झाली तरी देशांतर्गत ... वाढ होते.

अ) निर्यातीमध्ये

ब) निव्वळ उत्पन्नामध्ये

क) आयातीमध्ये

ड) परकीय नफ्यामध्ये

157) वास्तविक विनिमय दर आणि आयात यामध्ये ........ संबंध आहे.

अ) धनात्मक

ब) ऋणात्मक

क) स्थिर

ड) शून्य

158) देशांतर्गत उत्पादित केलेल्या वस्तूंची निर्यात परकीय देशातील उत्पन्नावर अवलंबून असते.

अ) देशांतर्गत उत्पन्नावर

ब) परकीय देशाच्या गुंतवणुकीवर

क) देशांतर्गत देशाच्या गुंतवणुकीवर

ड) परकीय देशातील उत्पन्नावर

159) देशांतर्गत उत्पादित केलेल्या वस्तूंची निर्यात ही ................दरावर अवलंबून असते.

अ) वास्तविक विनिमय

ब) वाजवी विनिमय

क) परकीय विनिमय

ड) यापैकी नाही

160) परकीय देशातील नागरिकांचे उत्पन्न वाढले तर देशांतर्गत उत्पादित केलेल्या वस्तूंची ............ वाढते.

अ) निर्यात

ब) निव्वळ उत्पन्न

क) आयात

ड) परकीय नफा

161) परकीय देशातील नागरिकांचे उत्पन्न व निर्यात यांच्यामध्ये ........... संबंध आहे.

अ) धनात्मक

ब) ऋणात्मक

क) स्थिर

ड)  शून्य

162) वास्तविक विनिमय दरामध्ये वाढ झाली तर देशांतर्गत उत्पादित केलेल्या वस्तुंच्या .......... घट होते.

अ) निर्यातीमध्ये

ब) निव्वळ उत्पन्नामध्ये

क) आयातीमध्ये

ड) परकीय नफ्यामध्ये

163) वास्तविक विनिमय दर आणि निर्यात यामध्ये ........... संबंध आहे.

अ) धनात्मक

ब) ऋणात्मक

क) स्थिर

ड) यापैकी सर्व

164) वास्तविक विनिमय दर का महत्त्वाचा मानला जातो.

अ) एखादा देश किती वस्तूंची निर्यात आणि आयात करेल हे ठरवण्यासाठी

ब) दोन देशांच्या चलनाची तुलना करण्यासाठी

क) व्यापारतोल अधिक्यासाठी

ड) चलन संकट दूर करण्यासाठी

165) भारतीय व्यक्तीला पर्यटनासाठी दुसऱ्या देशात जायचे असेल तर त्याच्या आवडीच्या इतर दोन देशांपैकी कोणत्या देशांमध्ये त्यांनी जावे यासाठी खर्चाच्या संदर्भामध्ये विचार करत असेल तर त्याला दोन देशांच्या ……………..दराचा विचार करावा लागतो.

अ) वास्तविक विनिमय

ब) वाजवी विनिमय

क) परकीय विनिमय

ड) यापैकी नाही

166) देशाला मंदीच्या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी आणि देशांतर्गत मागणी वाढविण्यासाठी जर सरकारने सरकारी खर्च वाढवण्याचा निर्णय घेतला तर देशाच्या उत्पादन वाढीवर कमी परिणाम होऊन व्यापारतोलावर ………परिणाम दिसून येतो.

अ) धनात्मक

ब) ऋणात्मक

क) स्थिर

ड) यापैकी सर्व

167) देशांतर्गत मागणीच्या वाढीसाठी सरकारने केलेल्या खर्चामुळे……

अ) व्यापार अधिक्य निर्माण होते

ब) गुणक हा मोठा राहतो

क) व्यापार तूट निर्माण होते आणि गुणक हा लहान राहतो

ड) परकीय उत्पन्न वाढते

168) सरकारी खर्चामुळे व्यापार तूट निर्माण होण्याचे आणि गुणक लहान रहाण्याचे कारण असे की,

अ) खुल्या अर्थव्यवस्थेत सरकारी खर्चामुळे वाढलेली मागणी देशांतर्गत वस्तू आणि परकीय वस्तूंमध्ये विभागली गेल्यामुळे दोन्हीच्या मागणीमध्ये घट घडवून आणते

ब) मागणीत वाढ होते

क) उत्पन्नात वाढ होते

ड) यापैकी सर्व

169) देशांतर्गत मागणीतील वाढीचा खुल्या अर्थव्यवस्थेत उत्पादनावर होणारा परिणाम बंदिस्त अर्थव्यवस्थेच्या तुलनेत .......... असतो .

अ) मोठा

ब) वाढीच्या दिशेने जाणारा

क) स्थिर

ड) लहान

170) सरकारी खर्चाच्या वाढीमुळे देशांतर्गत मागणीतील वाढीचा व्यापार संतुलनावर विपरीत परिणाम होतो

अ) मोठा

ब) अनुकूल

क) विपरीत

ड) धनात्मक

171) वास्तव विनिमय दराचा व्यापार तोलावर पुढीलपैकी कोणता परिणाम होतो?

अ) निर्यातवाढ

ब) आयातीत

क) विदेशी वस्तूंची देशी वस्तूंच्या तुलनेत किमतीत घट

ड) यापैकी सर्व

172) वास्तव विनिमय दराच्या परिणामात म्हणजे निर्यातीत वाढ व आयातीत घट होते म्हणजे निव्वळ निर्यातीत (व्यापारतोलात) वाढ होते यालाच ................असे म्हणतात .

अ) मार्शल लर्नर अट

ब) निक्सन अट

क) बूश अट

ड) रेगन अट

173) देशी चलनाच्या विशिष्ट संख्येच्या बदल्यात परकीय चलनाची प्राप्त होणारी संख्या म्हणजे .............होय.

अ) पैशातील उत्पन्न

ब) विनिमय दर

क) व्यवहारतोल

ड) गुंतवणूक

174) देशाच्या मध्यवर्ती बँकेने ठरवून दिलेल्या दराने सर्व परकीय व्यवहार होतात त्या दरास ........असे म्हणतात.

अ) वास्तव विनिमय दर

ब) वाजवी विनिमय दर

क) बदलता विनिमय दर

ड) स्थिर विनिमय दर

175)................... देशातील वस्तू परकीय देशातील नागरिकांना स्वस्त वाटू लागतात त्यामुळे निर्यात वाढते.

अ) उर्ध्वमूल्यनामुळे

ब) अधिमूल्यनामुळे

क) अवमूल्यनामुळे

ड) यापैकी सर्व

176) अवमूल्यनामुळे विदेशी  माल आपल्या देशातील लोकांना महाग वाटू लागतो त्यामुळे ................घटते.

अ) आयात

ब) निर्यात

क) अवमूल्यन

ड) गुंतवणूक

177) अवमूल्यनामुळे निर्यात वाढते आणि आयात घटते याचा परिणाम ............कमी होते.

अ) व्यापारतोल तूट

ब) चालू खाते तूट

क) भांडवली खाते तूट

ड) व्यवहारतोलातील तूट

178)   ........................मुळे देशी वस्तू परकीयांना महाग वाटू लागतात त्यामुळे निर्यात घटते.

अ) उर्ध्वमूल्यन

ब) अवमूल्यन

क) अपमूल्यन

ड) यापैकी सर्व

179).................. मध्ये मध्यवर्ती बँक चलनाचे अवमूल्यन व उर्ध्वमूल्यन करू शकत नाही.

अ) वास्तव विनिमय दर

ब) वाजवी विनिमय दर

क) बदलता विनिमय दर

ड) स्थिर विनिमय दर

180) ………………… व्यवस्थेत राजकोषीय धोरण हे मौद्रिक धोरणा पेक्षा अधिक सामर्थ्यवान असते.

अ) वास्तव विनिमय दर

ब) वाजवी विनिमय दर

क) स्थिर विनिमय दर

ड) बदलता विनिमय दर

181) स्थिर विनिमय दर धोरणांतर्गत मध्यवर्ती बँक चलनाचे उर्ध्वमूल्यन करू शकत नाही परंतु …………बदल करून समायोजन घवून आणता येते.

अ) पैशाच्या साठ्यात

ब) सोन्याच्या साठ्यात

क) राजकोषीय धोरणात

ड) वस्तूंच्या साठ्यात

182) विनिमय दरात स्थिरता राखण्याचे कारण ….

अ) आर्थिक क्रियामध्ये समतोल व्यापार समतोल राखण्यासाठी

ब) विदेशी व्याजदराच्या बदलांशी जुळवून घेण्यासाठी

क) राजकोषीय धोरण आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी पूरक नाही

ड) यापैकी सर्व

183) सुवर्ण परिमाण पद्धतीत प्रत्येक चलनाचे मुल्ये …………….. मध्ये निश्चित केले जात होते.

अ) सुवर्णात

ब) धातूत

क) वस्तूत

ड) यापैकी नाही

184) ................. पद्धतीत प्रत्येक चलनाचे मुल्ये सुवर्णात निश्चित केले जात होते त्यामुळे जगातील सर्व देशांची चलणे  परस्परांशी एक सामान दुव्याने जोडली होती.

अ) सुवर्ण परिमाण

ब) ब्रिटन वुड्स

क) परकीय विनिमय

ड) बदलत्या विनिमय

185) सुवर्ण परिमाण पद्धतीमध्ये दोन देशातील विनिमय दर हा .................दारावर अवलंबून होता.

अ) टाकसाळ

ब) लवचिक विनिमय

क) परकीय विनिमय

ड) बदलत्या विनिमय

186) सुवर्ण चलन पद्धतीत जगातील सर्व देशांत विनयमय दर ठरविण्याची जी पद्धती होती तिला.......... असे म्हणतात.

अ) टाकसाळ समता

ब) लवचिक विनिमय

क) परकीय विनिमय

ड) बदलत्या विनिमय

187) टाकसाळ समता दर =

अ) एका देशातील चलनातील शुद्ध सुवर्ण / दुसऱ्या देशाच्या चलनातील शुद्ध सुवर्ण

ब) एका देशातील वस्तू  / दुसऱ्या देशाच्या चलनातील शुद्ध सुवर्ण

क) X (एका ) देशातील चलनातील शुद्ध सुवर्ण / X (त्याच ) देशाच्या चलनातील शुद्ध सुवर्ण

ड)  एका देशातील वस्तू  / दुसऱ्या देशाच्या वस्तू

188) सुवर्णमान पद्धती चालण्यासाठी ------ असेल तर विनिमय दर टाकसाळ समता दर सामान राहील

अ) चलनातील शुद्ध सुवर्ण मागणी = चलनातील शुद्ध सुवर्ण पुरवठा

ब) चलनातील शुद्ध सुवर्ण मागणी > चलनातील शुद्ध सुवर्ण पुरवठा

क) चलनातील शुद्ध सुवर्ण मागणी < चलनातील शुद्ध सुवर्ण पुरवठा

ड) या पैकी सर्व

189) सुवर्णमान पद्धतीत टाकसाळ समता दरापेक्षा विनिमय दर एका विशिष्ठ बिंदूच्या पलीकडे जाऊ शकत नाही. विनिमय दराच्या परिवर्तनाची उच्चतम सीमा म्हणजे .......... होय.

अ) सुवर्ण निर्यात बिंदू

ब) सुवर्ण आयात बिंदू

क) वस्तू निर्यात बिंदू

ड) पैसा विनिमय बिंदू

190) सुवर्णमान पद्धतीत टाकसाळ समता दरापेक्षा विनिमय दर एका विशिष्ठ बिंदूच्या खाली घसरू शकत नाही. विनिमय दराच्या परिवर्तनाची निम्नतम सीमा म्हणजे .............. होय.

अ) सुवर्ण आयात बिंदू

ब) सुवर्ण निर्यात बिंदू

क) वस्तू निर्यात बिंदू

ड) पैसा विनिमय बिंदू

191) सुवर्ण परिमाण व्यवस्थेचे बलस्थान कोणते ?

अ) सर्व देशांच्या व्यापारतोलात संतुलन निर्माण करू शकणारी व्यवस्था

ब) कोणत्याही एका देशाला अधिक्य देणारी व्यवस्था

क) एका देशाची मागणी आणि दुसऱ्या देशाचा पुरवठा असंतुलित करणारी व्यवस्था

ड) या पैकी सर्व

192) सुवर्ण परिमाण व्यवस्था अपयशी होण्याच्या पुढील कारणांपैकी अयोग्य कारण ओळखा?

अ) ट्रीफिन कोंडी

ब) खेळाचे नियम ठरवण्यात अपयश

क) पहिल्या महायुद्धाचा खर्च भागविण्यात अपयशी

ड) सोन्याचा अपुरा पुरवठा

193) 1914 ते 1925 या कालावधीत भाववाढीचे प्रमाण जास्त असून देखील ग्रेट ब्रिटन ने प्रति औन्स सोन्याला ...... पौंड या पातळीला विनिमय दर निर्धारित करून युद्ध दरम्यानच्या काळात सुवर्णमान पद्धतीला पुन्हा सुरुवात केली.

अ ) 4.25

ब) 25

क) 8.5

ड) 113

194) US आणि फ्रान्स यांच्या कडे जगाच्या एकूण सुवर्ण साठ्यापैकी 70 % वाट असून देखील सुवर्ण परिमाण व्यवस्था त्यांना ती टिकवता आली नाही कारण ................

अ) रुल्स ऑफ द गेम ठरवण्यात अपयश आल्यामुळे

ब) केंद्रीय बँकेने सोन्याच्या साठ्यावर भर दिला

क) देशांनी आंकुचित मौद्रिक धोरण स्वीकारले

ड) या पैकी सर्व

195) जगातील बहुतेक देशांनी ......  व्यवस्थेचा त्याग पहिल्या महायुद्धाच्या काळात केला.

अ) सुवर्ण परिमाण

ब) वस्तू परिमाण

क) डॉलर परिमाण

ड) युरो परिमाण

196) बदलत्या विनिमय दरामुळे परकीय चलन बाजारातील अस्थिर परिस्थितीवर उपाय म्हणून ब्रेटन वुड्स परिषदेने 1944 मध्ये सुवर्ण धातू ऐवजी............. ची निवड करण्यात अली.

अ) अमेरिकन डॉलर

ब) शुद्ध सोने

क) पौंड

ड) युरो परिमाण

197) ................. पद्धतीनुसार सर्वच चलणे अमेरिकन डॉलरला खुंटीत करून  ठेवली होती.

अ) ब्रेटन वुड्स

ब) सुवर्ण परिमाण

क) युद्ध दरम्यान

ड) युरो परिमाण

198) ब्रेटन वुड्स पद्धतीनुसार सर्वच चलणे अमेरिकन डॉलरला खुंटीत करून  स्थिर विनिमय पद्धती स्वीकारली पण सदस्य देशांना व्यवहार तोलात मूलभूत असंतुलन निर्माण झाल्यास बदल कण्याची गरज भासल्यास ........ ची मान्यता घेण्याचे बंधन घालण्यात आले.

अ) अंतरराष्ट्रीय नाणे निधी (आय एम एफ)

ब) जागतिक बँक

क) जागतिक व्यापार संघटना

ड) जागतिक आरोग्य संघटना

199) ब्रेटन वुड्स व्यवस्थेच्या ऱ्हासाच्या  पुढील कारणांपैकी अयोग्य पर्याय ओळखा.

अ) सोन्याचा अपुरा पुरवठा

ब) ट्रीफिन कोंडी Triffin Dilemma

क) आंतरराष्ट्रीय तरलतेची कमतरता

ड) अंगभूत अस्थिरता

200) ब्रेटन वुड्स व्यवस्थेच्या ऱ्हासाच्या  पुढील कारणांपैकी अयोग्य पर्याय ओळखा.

अ) सुवर्ण परिमाणाचे नियम पळाले नाही

ब) US च्या धोरणामधील चुका

क) डॉलरच्या सट्टेबाजीसाठी संधी

ड) डॉलरवरील विश्वास ढळला

201) विनिमय दर यंत्रणेचे उद्दिष्ट्ये काय?

अ) विनिमय दरातील चढ उतार कमी करणे

ब) डॉलरचा सुवर्णाशी मेळ घालणे

क) विस्तारित धोरण लागू करणे

ड) या पैकी नाही

202) विनिमय दर यंत्रणेचे उद्दिष्ट्ये काय?

अ) मौद्रिक स्थिरता निर्माण करणे

ब) डॉलरचा सुवर्णाशी मेळ घालणे

क) विस्तारित धोरण लागू करणे

ड) या पैकी नाही

203) बिळातील साप (Snake in the tunnel) हि बिरुदावली कशास दिली जाते.

अ) विनिमय दर यंत्रणा (ERM)

ब) सुवर्णमान यंत्रणा

क) डॉलर यंत्रणा

ड) युरो यंत्रणा

204) युरोपियन मौद्रिक पद्धतीची (EMS) स्थापना ......... मध्ये झाली.

अ) 1979

ब) 1944

क) 1991

ड) 2014

205) युरोपियन मौद्रिक संघाने (EMU) प्रत्येक दोन चलनांमध्ये द्विपक्षीय विनिमय दर निर्धारित केला होता व त्या विनिमय दाराच्या उच्च व निम्ह्न पातळ्या ठरवल्या होत्या त्या कोणत्या ?

अ) +2.5 ते - 2.5

ब) - 5 ते + 5

क) +6 ते - 6

ड) + 2.5 ते + 5

206) सुधारीत विनिमय दर यंत्रणा ........... या नावाने ओळखली जाते.

अ) ERM 2

ब) ERM 3

क) EMU

ड) EMU 2

207) सुधारीत विनिमय दर यंत्रणा (ERM 2) .............. या वर्षी स्थापन करण्यात अली.

अ) 1999

ब) 1944

क) 1991

ड) 2014

208) सुवर्ण परिमाण व्यवस्थेचा कालावधी .............

अ) 1980 - 1984

ब) 1944 - 1991

क) 1991 - 1993

ड) 2014 - 2019

209) डॉलर व्यवस्थेचा कालावधी ...........

अ) 1947 - 1971

ब) 1980 - 1914

क) 1991 - 1993

ड) 2014 - 2019

210) ........ या व्यवस्थेअंतर्गत एखादा देश दुसऱ्या देशाचे चलन स्वतःच्या देशात कायदेशीरपणे वापरू शकतो.

अ) डॉलरीकरण (Dollarization)

ब) युरोकरण

क) मौद्रीकीकरण

ड) यापैकी नाही

211) ..... या व्यवस्थे नुसार एका देशाच्या चलनाचा दुसऱ्या देशाच्या चलनाशी विनिमय दर ताठरपणे निश्चित केला जातो.

अ) चलन विभाग व्यवस्था (currency board arrangements)

ब) डॉलरीकरण (Dollarization)

क) युरोकरण

ड) मौद्रीकीकरण

212) 1957 मध्ये रोम करारांतर्गत स्थापन झालेल्या युरोपियन संघाचे मुख्य उद्दिष्टे ..........

अ) वेगवेगळ्या देशांमध्ये श्रमाचा मुक्त संचार

ब) सदस्य देशांमध्ये उदार व्यापार प्रोत्साहित करणे

क) वेगवेगळ्या देशांमध्ये भांडवलाचा मुक्त संचार

ड) यापैकी सर्व

213) युरोपियन मौद्रिक व्यवस्थेची उद्दिष्टे .........

अ) युरोपियन संघासाठी एकत्रित मौद्रिक व्यवस्था निर्माण करणे.

ब) युरोपियन संघासाठी सामायिक चलन निर्मिती

क) युरोपियन संघासाठी विनिमयदर स्थिरता निर्माण करणे.

ड) यापैकी सर्व

214) युरोपियन मौद्रिक व्यवस्थेची उद्दिष्टे .........

अ) युरोपियन संघासाठी सामायिक व्यापार धोरण  निर्माण करणे.

ब) युरोपियन संघासाठी सामायिक केंद्रीय बँक तयार करणे.

क) युरोपियन संघासाठी विनिमयदर स्थिरता निर्माण करणे.

ड) यापैकी सर्व

215) 1989 मध्ये युरोपियन कमिशनच्या अध्यक्षाच्या समितीने सुचवलेल्या मौद्रिक एकसंघतेच्या त्रीस्थरीय संक्रमणामध्ये (three Stage transition) पुढील पैकी कशाचा समावेश नाही.

अ) जागतिक आर्थिक संकट दूर करणे.

ब) युरोपियन मौद्रिक संस्थांकडे स्थूल आर्थिक धोरण ठरविण्याचे अधीकार देणे.

क) सर्वांसाठी एकाच युरो चलनाची निर्मिती करणे.

ड) मौद्रिक आणि राजकोषीय धोरणांचे एकत्रीकरण

216) 1979 मध्ये युरोपियन युनियनने एक नवीन चलन एकक अस्थित्वात आणले त्याला ………….असे म्हणतात.

अ) युरोपियन चलन एकक (ECU)

ब) डॉलर

क) येन

ड) रुपया

217) युरोपियन देशांच्या एकत्रीकरणासाठी युरोपियन समुदायाने ……… मध्ये मास्ट्रीच कराराची (Maastricht treaty) स्थापना झाली.

अ) 7 फेब्रुवारी 1992

ब) 5 डिसेंबर 1979

क) 7 जानेवारी 1989

ड) 5 मे 1967

218) मास्ट्रीच कराराने (Maastricht treaty) युरोपियन संघाची स्थापना केली त्याचेच नामकरण ……. असे केले गेले.

अ) युरोपियन समुदाय (EC)

ब) युरोपियन मौद्रिक संस्था(EMI)

क) युरोपियन सामूहिक बाजार(ECM)

ड) या पैकी नाही

219) मास्ट्रीच कराराचे (Maastricht treaty) मुख्ये उद्दिष्ट, संतुलित आणि चिरस्थायी विकासाला प्रोत्साहन देऊन आर्थिक आणि सामाजिक प्रगती साधने हे पुढील मुद्यांच्या आधारे पूर्ण करता येईल .

अ) अंतर्गत सीमांमध्ये एकाच चलन तयार करणे

ब) संघाचे सामूहिक संरक्षण करणाऱ्या सामूहिक परकीय सुरक्षा धोरणांची अंमलबजावणी करणे

क) युरोपियन नागरिकत्व निर्माण करणे

ड) यापैकी सर्व

220) मास्ट्रीच कराराचे (Maastricht treaty) पहिले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी युरोपियन संघाने (EU) युरो हे सामूहिक चलन ....... मध्ये प्रस्थावित केले .

अ) जानेवारी 1999

ब) जुन 1999

क) ऑगस्ट 1999

ड) डिसेम्बर 1999

221) आत्तापर्यंत युरो हे चलन युरोपमधील ....... देशांनी स्वीकारले आहे.

अ) 17

ब) 4

क) 9

ड) 15

222) युरो हे चलन ....... या चिन्हाने दर्शिविले जाते.

अ) €

ब) $

क) £

ड) ¥

223) युरो चलनातील (€) हे चिन्ह ......... हा ग्रीक शब्द वापरून बनवले आहे.

अ) इप्सिलॉन

ब) मॅक्रो

क) इपॉलीन

ड) येन

224) युरो चलनातील € या चिन्हामधील दोन आडव्या रेषा युरोची ........ दर्शवितात.

अ) स्थिरता

ब) स्वातंत्र

क) विकास

ड) स्वावलंबन

225) युरोपियन संघातील देशांच्या इतर चलना ऐवजी युरो हे चलन खऱ्या अर्थाने मोठ्याप्रमाणात रोख स्वरूपात वापरास ........ मध्ये आले.

अ) जानेवारी 2002

ब) डिसेंबर 1999

क) जानेवारी 1999

ड) डिसेंबर 1998

226) जानेवारी 1999 मध्ये जेंव्हा युरो हे चलन प्रस्थावित झाले तेंव्हाचा त्याचा विनिमय दर ....... असा होता.

अ) €1 = $1. 17

ब) €1 = $30

क) €1 = $40

ड) €1 = $60

227) युरोपियन मौद्रिक संघामध्ये सहभागी होण्यासाठी लागणाऱ्या अटींपैकी पुढील पैकी कोणती अट नाही

अ) देश युरोपियन देश असू नये

ब) अर्थसंकल्प तूट देशाच्या GDP च्या 3 टक्के पेक्षा जास्त असू नये.

क) एकूण सरकारी कर्जाचे प्रमाण देशाच्या GDP च्या 60 टक्के पेक्षा जास्त असू नये.

ड) भाववाढीचा दर 1.5 टक्के पेक्षा जास्त असू नये.

228) युरोपियन मौद्रिक संघामध्ये सहभागी होण्यासाठी लागणाऱ्या अटींपैकी पुढील पैकी कोणती अट नाही.

अ) चलन बोर्ड व्यवस्थे प्रमाणे विनिमय दार निशचित व्हावा.

ब) दीर्घकालीन व्याजदर हा तीन देशांच्या सरासरी व्याजदराच्या दोन बिंदूपेक्षा कमी असावा.

क) एकूण सरकारी कर्जाचे प्रमाण देशाच्या GDP च्या 60 टक्के पेक्षा जास्त असू नये.

ड) युरोपियन मौद्रिक संघात सहभागी होण्या आधी दोन वर्ष त्या देशाचा सरासरी विनिमय दर युरोपियन मौद्रिक व्यवस्थेच्या सरासरी पेक्षा 2.25 टक्के पेक्षा जास्त कमी झालेला नसावा.

229) युरोपियन संघाने युरो हे सामूहिक चलन स्वीकारल्यामुळे झालेल्या फायद्यामध्ये पुढील पैकी कोणता पर्याय योग्य नाही.

अ) हि IMF ने ठरवलेली स्थिर विनिमय व्यवस्था आहे.

ब) सदस्य देशांमध्ये चलनातील अस्थिरता नाहीशी झाली.

क) सदस्य देशांमध्ये आर्थिक आणि वित्तीय एकत्रीकरण झपाट्याने झाले.

ड) युरो विभाग सदस्यांना चलनाचे आपापसात हस्तांतरण करण्याची गरज नाही.

230) युरोपियन संघाने युरो हे सामूहिक चलन स्वीकारल्यामुळे झालेल्या फायद्यामध्ये पुढील पैकी कोणता पर्याय योग्य नाही .

अ) सोन्याचा साठा वाढला.

ब) युरोपियन केंद्रीय बँके स्वतंत्र मौद्रिक धोरण देऊ शकते.

क) आर्थिक संकटांना सामोरे जाणाऱ्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात शिस्त निर्माण झाली.

ड) आंतरराष्ट्रीय वित्तीय बाजारातून कर्ज घेणे स्वस्त बनले.

231) युरोपियन संघाने युरो हे सामूहिक चलन स्वीकारल्यामुळे झालेला तोटा  कोणता?

अ) कोणताही देश वित्तीय संकट सोडवण्यासाठी स्वतः चे वैयक्तिक धोरण लागू करू शकत नव्हता.

ब) सदस्य देशांमध्ये चलनातील अस्थिरता नाहीशी झाली.

क) सदस्य देशांमध्ये आर्थिक आणि वित्तीय एकत्रीकरण झपाट्याने झाले.

ड) युरो विभाग सदस्यांना चलनाचे आपापसात  हस्तांतरण करण्याची गरज नाही.

232) युरोपियन संघाने युरो हे सामूहिक चलन स्वीकारल्यामुळे झालेला तोटा कोणता?

अ) भाषिक आणि सांस्कृतिक समस्यांमुळे सदस्य देशांतर्गत मजूरांची गतिशीलता कमी झाली

ब) युरोपियन केंद्रीय बँके स्वतंत्र मौद्रिक धोरण देऊ शकते

क) आर्थिक संकटांना सामोरे जाणाऱ्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात शिस्त निर्माण झाली

ड) आंतरराष्ट्रीय वित्तीय बाजारातून कर्ज घेणे स्वस्त बनले

233) युरोपियन संघाने युरो हे सामूहिक चलन स्वीकारल्यामुळे झालेला फायदा कोणता?

अ) सदस्य देशांमध्ये आर्थिक आणि वित्तीय एकत्रीकरण झपाट्याने झाले

ब) कोणताही देश वित्तीय संकट सोडवण्यासाठी स्वतः चे वैयक्तिक धोरण लागू करू शकत नव्हता

क) भाषिक समस्यांमुळे सदस्य देशांतर्गत मजूरांची गतिशीलता कमी झाली

ड) सांस्कृतिक समस्यांमुळे सदस्य देशांतर्गत मजूरांची गतिशीलता कमी झाली

234) युरोपियन संघाने युरो हे सामूहिक चलन स्वीकारल्यामुळे झालेला फायदा कोणता?

अ) युरोपियन केंद्रीय बँके स्वतंत्र मौद्रिक धोरण देऊ शकते .

ब) कोणताही देश वित्तीय संकट सोडवण्यासाठी स्वतः चे वैयक्तिक धोरण लागू करू शकत नव्हता

क) भाषिक समस्यांमुळे सदस्य देशांतर्गत मजूरांची गतिशीलता कमी झाली

ड) सांस्कृतिक समस्यांमुळे सदस्य देशांतर्गत मजूरांची गतिशीलता कमी झाली.

235) युरोपियन संघाने युरो हे सामूहिक चलन स्वीकारल्यामुळे झालेला फायदा कोणता

अ) आर्थिक संकटांना सामोरे जाणाऱ्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात शिस्त निर्माण झाली

ब) कोणताही देश वित्तीय संकट सोडवण्यासाठी स्वतः चे वैयक्तिक धोरण लागू करू शकत नव्हता

क) भाषिक समस्यांमुळे सदस्य देशांतर्गत मजूरांची गतिशीलता कमी झाली

ड) सांस्कृतिक समस्यांमुळे सदस्य देशांतर्गत मजूरांची गतिशीलता कमी झाली

236) अमेरिकेत .......... हे राष्ट्राध्यक्ष असतांना डॉलर परिवर्तनीय करण्यात आला आणि ब्रेटन वुड्स पद्धती कोसळली.

अ) निक्सन

ब) बूश

क) रेगन

क) केनेडी

237) 2007-08 च्या अमेरिके मध्ये सुरु झालेल्या जागतिक वित्तीय संकटाचे प्रमुख कारण ....... हे होते.

अ) सब प्राईम लोन

ब) भ्रष्टाचार

क) भाववाढ

ड) चालू खात्यावरील तूट

238) USA मधील अंतर्गत संकट जागतिक वित्तीय संकट बनण्याचे मुख्य कारण ....... हे होय

अ) या देशातील व्यापार आणि गुंतवणुकीतील जवळचे संबंध

ब) आंतरराष्ट्रीय प्रसार

क) जागतिकीकरण

ड) या पैकी सर्व

239) युरो संकट निर्माण होण्याला जबाबदार कोण?

अ) अंशतः जागतिक वित्तीय संकट आणि अंशतः स्वतः चे धोरण

ब) पूर्णतः जागतिक वित्तीय संकट

क) पूर्णतः युरो देशांचे चुकीचे धोरण

ड) जागतिक युद्ध

240) युरो संकट निर्माण होण्याचे पुढील पैकी कोणते कारण नाही.

अ) सोन्याचं साठ्यात घट

ब) त्या देशांचा वाढता सार्वजनिक खर्च

क) भाववाढ

ड) सदस्य देशांतील अस्पर्धात्मकता

241)युरो संकटाला सामोरे जाण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये पुढील पैकी कोणता पर्याय चुकीचा आहे.

अ) व्यवहार डॉलर मध्ये करणे

ब) मौद्रिक उपाययोजना

क) राजकोषीय उपाययोजना

ड) बेल आउट उपाययोजना

242) युरो संकटाला सामोरे जाण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमध्ये पुढील पैकी कोणता पर्याय चुकीचा आहे.

अ) बदलता विनिमय दर उपाययोजना

ब) स्पर्धात्मकता वाढवून निर्यात वृद्धी

क) श्रम खर्च कमी करण्यात आला

ड) पर्यावरण कर कार्पोरेशन कर कमी करण्यात आले

243) आसियान पायाभूत गुंतवणूक बँकेची स्थापना कधी झाली

अ) 25 डिसेंबर 2015

ब) 15 जुलै 2014

क) 10 ऑगस्ट 2018

ड) 20 जानेवारी 2019

244) BRICS देशांनी नवीन विकास बँक या विकास बँकेच्या करारावर ...... मध्ये सह्या केल्या

अ) 15 जुलै 2014

ब) 25 डिसेंबर 2015

क) 10 ऑगस्ट 2018

ड) 20 जानेवारी 2019

245) ब्रेटन वूड्स परिषद ................मध्ये घेण्यात आली.

अ) जुलै 1944

ब) डिसेंबर 1944

क) जानेवारी 1945

ड) नोव्हेंबर 1943

246) ब्रेटन वूड्स (Bretton Woods) परिषदेत किती देश सामील झाले होते?

अ) 41

ब) 64

क) 44

ड) 50

247) सुवर्ण परिमानाचा त्याग जगातील सुवर्ण परिमाण स्वीकारलेल्या देशांनी केव्हा केला?

अ) पहिल्या महायुद्धाच्या काळात

ब) दुसऱ्या महायुद्धाच्या काळात

क) जागतिक महामंदीच्या काळात

ड) वरीलपैकी एकही नाही.

248) पहिल्या जागतिक महायुद्धानंतर पुन्हा सुवर्ण परिमान स्वीकारणारा पहिलं देश कोणता होता?

अ) जर्मनी

ब) अमेरिका

क) फ्रांस

ड) इटली

249) ब्रेटन वुड्स पद्धत ((Bretton Woods System)..........

अ) बदलता विनिमय पद्धती होय

ब) सुवर्ण धातू पद्धती होय

क) सुवर्ण विनिमय पद्धती होय

ड) वरीलपैकी एकही नाही

250) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ते सांगा.

अ) ब्रेटन वुड्स परिषदेने आंतरराष्ट्रीय नाणेनिधिला जन्म दिला.

ब) ब्रेटन वुड्स परिषदेचा आंतरराष्ट्रीय नाणेनिधिशी कोणताही संबंध नाही

क) ब्रेटन वुड्स परिषद ही मौद्रिक आणि वित्तीय परिषद होती

ड) 'अ' आणि 'क'

251) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ते स्पष्ट करा.

अ) ब्रेटन वुड्स पद्धतीने व्यापार आणि वित्त याच्या बाबतीत देशांना नियमाची संहिता घालून दिली

ब) ब्रेटन वुड्स पद्धतीने व्यापारतोल समस्यांवर मात करण्यासाठी कर्जेचे उचल करण्याच्या सवलती दिल्या

क) ब्रेटन वुड्स पद्धती अनेक वर्षापर्यंत महत्वाची ठरलेली आहे

ड) वरील सर्व

252) अमेरिकेत .......... हे राष्ट्राध्यक्ष असतांना डॉलर परिवर्तनीय करण्यात आला आणि ब्रेटन वुड्स पद्धती कोसळली.

अ) निक्सन

ब) बूश

क) रेगन

क) केनेडी

253) जीअर्थव्यवस्था जगातील इतर देशांच्या अर्थव्यवस्थेसोबत मुक्तपणे व्यवहार करते त्या अर्थव्यवस्थेला ......... असे म्हणतात.

अ) बंदिस्त अर्थव्यवस्था

ब) खुली अर्थव्यवस्था

क) समाजवादी अर्थव्यवस्था

ड) केंद्रीय अर्थव्यवस्था